वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर- 440010

E Mail – sameti 123@yahoo.co.in Phone- 0712 2555999, 2541944

०३

जा. क्रमांक वनामती/आस्था/राप्रधो/ /१८
नागपूर दिनांक:-

## स्वीयेत्तर सेवेअंतर्गत प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदाची जाहिरात

वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, धरमपेठ, नागपूर संस्थेमध्ये वर्ग-२ व वर्ग-३ अधिकारी/कर्मचारी यांना प्रशासकीय कामकाजाचे प्रशिक्षण दिले जातात. संस्थेतील खाली नमुद करण्यात आलेल्या रिक्त पदांवर सद्यस्थितीमध्ये शासन सेवेत कार्यरत असणा-या खालील सवंर्गाच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडून स्वीयेत्तर सेवेअंतर्गत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे. पदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | रिक्त पदाचे नाव | संख्या | वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | सहाय्यक प्राध्यापक वर्ग-१ | ०६ | १५६००-३९१०० (ग्रेड पे ५०००) | १. लोकप्रशासन व कायदे अंमलबजावणी/ महसूल विभाग संबंधीत २ पदे<br>२. ग्राम-कृषी विकास विभाग संबंधीत १ पदे<br>३. समाज कल्याण विभाग संबंधीत १ पद<br>४. नागरी विकास विभाग संबंधीत १ पद<br>५. अभियांत्रिकी व आरोग्य सेवेसंबंधात १ पद |
| २ | वसतीगृह तथा आवार व्यवस्थापक वर्ग-३ | ०१ | ९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००) | शासकीय वसतीगृह व प्रशासकीय संस्थेमध्ये काम केले असल्यास प्राधान्य |
| ३ | ग्रंथपाल वर्ग-३ | ०१ | ५२००-२०२०० (ग्रेड पे २४००) | प्रशिक्षण संस्थेमध्ये काम केले असल्यास प्राधान्य |

१. स्वीयेत्तर सेवेअंतर्गत प्रतिनियुक्तीने येणा-या इच्छूकांनी जाहिरातीत दिलेल्या पदांकरिता सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्ज संगणकावर टंकलिखित करुन दिनांक ---------------- पर्यत कार्यालयीन वेळेत खालील पत्यावर पोस्टाने किंवा समक्ष सादर करावेत.
२. स्वीयेत्तर सेवेअंतर्गत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी अर्ज सादर करणारे अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचा अर्ज सादर करतांना अर्जासोबत शासन सेवेत सध्या कार्यरत असल्याचे कार्यालय प्रमुखांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.
३. साप्रवि शा. नि. क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र१३७/कार्यासन-१२/मुंबई-३२, दिनांक १७.१२.२०१६ व दिनांक १६.०२.२०१८ नुसार प्रतिनियुक्ती करिता शासनाचे निर्धारित केलेल्या अटी व शर्ती लागू राहील. त्यानुसार अर्जाचा विचार केला जाईल.
४. कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसल्याचे स्वसाक्षांकित प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.
५. संस्थेमध्ये स्वीयेत्तर सेवेअंतर्गत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेसाठी सादर करावयाच्या अर्जाचा नमुना संस्थेतील पदांची कर्तव्ये, जवाबदा-या, कार्यपध्दती बाबत सर्व संबंधीत शासन निर्णय सोबत जोडले आहे.
६. अर्ज मा. संचालक वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्ही. आय. पी. रोड, धरमपेठ, नागपूर -१० या पत्यावर पाठवावेत.

संचालक
वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार
व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर

Scanned by CamScanner